महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) अधिनियम २०१९ अन्वये आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील माहे एप्रिल, २०१९ ते माहे जुलै,२०१९ या कालावधीकरीता मंजुर लेखानुदान वितरणाबाबत.. (**२२०२- सर्वसाधारण शिक्षण - लेखाशिर्ष २२०२ १९०१ , २२०२ १९४८ व २२०२ एच ९७३ राज्य स्तर योजना**)

**महाराष्ट्र शासन.**

आदिवासी विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१९/ प्र.क्र. ०४ / कार्यासन.६

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२

दिनांक: ५.०४.२०१९.

**वाचा -**

१) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४५/अर्थ-३, दि.०१.०४.२०१९

२) अर्थसंकल्प शाखा, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,मुंबई यांचा दि.४.०४.२०१९ रोजीचा प्रस्ताव

**शासन निर्णय-**

सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता अंतरिम अर्थसंकल्प दि.२७.०२.२०१९ रोजी विधानमंडळास सादर करण्यात आला. सदर अर्थसंकल्प अंतरिम असल्याने अतिरिक्त अर्थसंकल्प सादर करुन विनियोजन विधेयक मंजुर होईपर्यतच्या कालावधीसाठीचा माहे एप्रिल, २०१९ ते जुलै, २०१९ या चार महिन्यांचा खर्च भागविण्यासाठी विनियोजन (लेखानुदान) विधेयक २०१९ मंजूर करण्यात आले असून सदर विधेयकाचे अधिनियमात रुपांतर झालेले आहे. सदर अधिनियमान्वये सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पातील प्रस्तावित लेखानुदानातून दि.१.०४.२०१९ ते दि.३१.०७.२०१९ पर्यत खर्च करण्यास प्रशासकिय विभागास प्राधिकृत करण्यात आलेले आहे. त्यानुसार आदिवासी घटक कार्यक्रमातंर्गत मागणी क्र.टी-५ मधील **२२०२- सर्वसाधारण शिक्षण** या मुख्य लेखाशिर्षांतर्गत खालील योजनांची अंमलबजावणी शालेय शिक्षण विभागामार्फत करण्यात येत असल्याने त्यांच्या संदर्भाधीन क्र.२ येथील प्रस्तावास अनुसरुन वार्षिक अर्थसंकल्पीय तरतूदीपैकी माहे एप्रिल,२०१९ ते जुलै,२०१९ या चार महिन्यासाठी खालीलप्रमाणे तरतूदी प्रशासकिय विभाग प्रमुख म्हणून प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई यांना अर्थसंकल्पीय निधी वितरण प्रणालीवर वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

रु. हजारात

| अ.क्र. | योजनेचे नाव | अर्थसंकल्पित तरतूद | सदर शासन निर्णयाद्वारे वितरीत करण्यात येत असलेली तरतूद |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | सर्वसाधारण माध्यमिक शाळांना सहायक अनुदान. (२२०२ १९०१ ) - ३६ सहाय्यक अनुदाने (वेतन) | ५५२८४८.०० | १८४२८३.०० |
| २ | अशासकीय कनिष्ठ महाविद्यालयांना सहायक अनुदान (२२०२ १९४८ ) - ३६ सहाय्यक अनुदाने (वेतन) | २६४०६.०० | ८८०२.०० |
| ३ | सैनिक शाळेमधील आदिवासी विद्यार्थ्यांच्या तुकडीला सहाय्य (२२०२ एच ९७३) - ३६ सहाय्यक अनुदाने (वेतन) | १६३७४९.०० | ५४५८३.०० |
| **एकुण** | | **७४३००३.००** | **२४७६६८.००** |

२. सदर निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर वितरीत करण्यात आला आहे. यानुषंगाने माहे एप्रिल,२०१९ ते जुलै,२०१९ या चार महिन्यासाठी संगणक वितरण प्रणालीवर उपलब्ध कॅश फ्लो प्रमाणे खर्च करण्याची दक्षता सर्व संबंधितांनी घ्यावी.

३. विभाग प्रमुखांनी/नियंत्रक अधिकारी यांनी स्तंभ क्र. ४ मध्ये दर्शविलेल्या तरतुदी त्यांच्या अधिपत्याखालील आहरण व संवितरण अधिका-यांना अर्थसंकल्पीय नियम पुस्तिकेतील दिलेल्या सुचनांप्रमाणे तात्काळ वितरित करावी. तसेच सदर शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेला निधी खर्च करतांना विभागप्रमुख तसेच नियंत्रक अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका, वित्तीय अधिकार नियमपुस्तिका यामधील वित्तिय नियम तसेच वित्त विभागाच्या संदर्भाधीन दि.१.०४.२०१९ च्या शासन परिपत्रकातील दिलेल्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन करावे.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि.१.०४.२०१९ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये प्रशासकिय विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३३०१७४६३३५७२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Ravindra Digambarrao Aute

Digitally signed by Ravindra Digambarrao Aute
DN: cn=Ravindra Digambarrao Aute, o=Tribal Development Department, ou=Government of Maharashtra, email=rajendra.aute@nic.in, c=IN
Date: 2019.04.05 10:19:03 +05'30'

रविंद्र दि.औटे
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
२. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
३. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/ नागपूर/ अमरावती.
५. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ५ वा माळा, विधानभवन, मुंबई.
६. महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
७. वित्त विभाग ( अर्थोपाय /अर्थ-१९ / व्यय-१४ ) मंत्रालय, मुंबई-३२
८. निवडनस्ती, कार्यासन- ०६, आदिवासी विकास विभाग.